सकाळ 17 जुलै 02

# कमला कॉलेजमध्ये पोस्टर प्रदर्शन

कोल्हापूर, ता. १६ : येथील कमला कॉलेजमध्ये लोकसंख्या दिनानिमित्त लोकसंख्या शिक्षण मंडळ आणि कॉलेजमधील अर्थशास्त्र विभागाने पोस्टर प्रदर्शन भरविले होते. तेरा ते पंधरा जुलैपर्यंत प्रदर्शन होते.

सामाजिक, आर्थिक व विविध समस्यांवर आधारित पोस्टर्स प्रदर्शनात ठेवली होती. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. मंडळाचे प्रकल्पाधिकारी प्रा. एन. व्ही. पोवार, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर, प्रा. सौ. ए. व्ही. पाठक उपस्थित होते.